मोठेपणाने वागण्यासाठी अहंकाराचा त्याग करावा लागतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

dainiklokaarambh@gmail.com LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार ५ फेब्रुवारी २०२५ | अंक५८ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?

धनंजय मुंडे गुंडगिरी थांबवत नाही, मी त्यांना कितीतरी वेळा सांगितलं टोळी थांबवा, यामुळे तुमचं आणि समाजाचं वाटोळ होईल. पण त्यांना भान राहिले नाही. त्यांना वाटतं टोळी मारा-मा-या, भांडण करून आपल्याला पैसे आणून देईल. पण त्यांना हे कळत नाही की यामुळे बीड जिल्ह्याचं किती नुकसान झालं आहे. धनंजय मुंडे हे अजूनही मग्रुरीमध्ये वागत आहेत, असंही यावेळी जरांगे पाटील यांनी म्हटलं



# जात आणि बीड बदनाम झाला तर हाच मोहरक्या आहे समजा!

## मनोज जरांगे पाटील यांनी घेतलं थेट बड्या नेत्याचं नाव

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. चो-या दरोडे टाकणारे धनंजय मुंडे यांच्या जवळचे आहेत. धनंजय मुंडे या षडयंत्रामध्ये सहभागी आहेत, आम्हाला याची १०० टक्के खात्री आहे. मराठ्यांची गरज संपली, आता पुरावे नष्ट केले जाऊ शकतात, सिडीआर तपासले तर त्यांचे संबंध उघड होतील, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे पाटील?ज्या मराठा समाजाने मदत केली आहे, असं धनंजय मुंडे म्हणतात, आता त्या समाजाशीच ते गद्दारी करत आहेत. आता मराठ्यांची गरज संपली, त्यावेळी मराठ्यांची गरज होती, ते खोट बोलणारच, पण पाप जास्त दिवस झाकत नसतं. टोळी आतमध्ये जाणार म्हणजे जाणारच. मात्र यांनी जर पुरावे नष्ट केले तर याला पूर्णपणे जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे असतील असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, अजूनही टोळी सापडत नाही. गेल्या दोन वर्षाचे सीडीआर निघाले पाहिजेत. म्हणजे टोळी कोण चालवत होतं, हे समोर येईल. जात आणि बीड जिल्हा बदनाम झाला आहे. धनंजय मुंडे यांनी आतापर्यंत गुंडगिरीला



पाठबळ आणि साथ दिली. कारण हेच टोळी चालवत होते. बाकीच्यांना पुढे घालण्यात आलं, मात्र टोळीचा म्होरक्या हाच आहे. भविष्यात पुरावे नष्ट झाले तर याला जबाबदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार राहतील, असा इशारा यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

## सेवातीर्थ अनाथ आश्रम येथे शाळेत साहित्य व हरिपाठ वाटप



सेवातिर्थ अनाथ आश्रम मातोरी येथे मा.आ. सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित माजी भाजपा तालुका अध्यक्ष डॉ.मधुसूदन खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रियांका खेडकर यांनी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अनाथ आणि गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून मुलांच्या मनामध्ये सांप्रदायिक आणि संस्काराची शिदोरी रहावी म्हणुन हरिपाठ दिला. त्याच प्रकारे मुलांना खाऊ वाटप केला. अशा प्रकारे आदरणीय आण्णा चा वाढदिवस साजरा करून शुभेच्छा दिल्या. आदरणीय आण्णा ची सर्वसामान्य जनतेचे सेवेची तळमळ आहे ती त्यांच्या प्रत्येक कार्यकर्ता कडून होत रहावी. आणि दिन दुबळ्या लोकांची मदत होत रहावी यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. यावेळी उपस्थित सेवातीर्थ चे चालक सचिन गायकवाड व त्यांच्या पत्नी तसेच सौ गीता दुबाले,सौ विद्याताई जरांगे, गीतांजली खेडकर, सौ वर्षा जरांगे व निखिल राख हे उपस्थित होते.

## भुमिपुजन सोहळा; आष्टीतील दोन्ही कार्यक्रमास उपस्थित रहा जि.प.सदस्य ॲड.प्रकाश कवठेकर यांचे अवाहन

बीड/प्रतिनिधीः आ.सुरेश धस यांच्या अथक प्रयत्नातून कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प अंतर्गत आष्टी उपसा सिंचन क्र.३ शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामाची पाहणी तसेच बोगदा कामाचे भुमिपुजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या हस्ते होत आहे. याच बरोबर श्री.मच्छिंद्रनाथ समाधी मंदिर बांधकाम भुमिपुजन समारंभ आयोजीत केला आहे. या दोन्ही कार्यक्रमास कार्यकर्ते, शेतकरी, भाविक भक्तांनी उपस्थित रहावे, असे अवाहन डोंगरकिन्ही गटाचे जिल्हा परिषद सदस्यॲड. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.

प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, आष्टी हा कायम दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. येथील



शेतक-यांच्या जिवनात हरितक्रांती व्हावी, असे स्वप्न आ.सुरेश धस यांनी काही वर्षांपुर्वी पाहिले आणि पाहिलेले स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले.या प्रयत्नाला आता फळ दिसत असून कृष्णा मराठा सिंचन प्रकलब अंतर्गत आष्टी उपसा सिंचन क्र.३ शिंपोरा ते खुंटेफळ पाईपलाईन कामांची पाहणी तसेच बोगदा कामाचे भुमिपुजन आज होत आहे. सदरील कार्यक्रम हा दि.५ रोजी सकाळी ११.३० वाजता खुंटेफळ येथे होत आहे. तर लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.मच्छिंद्रनाथ समाधी मंदिर बांधकामाचे भुमीपुजन दि.५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता मच्छिंद्रनाथ गड सावरगाव मायंबा येथे होत आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आ.मोनिका राजळे, आ.संग्राम जगताप, ह.भ.प.मधुकर महाराज शास्त्री, ह.भ.प.बबनमहाराज बहिरवाळ, अशोक पालवे महाराज, मस्तनाथ महाराज, ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे, मा.आ.साहेबराव दरेकर यांची उपस्थिती राहणार आहे. या दोन्ही कार्यक्रमास सर्व कार्यकर्ते, शेतकरी आणि गडाच्या भाविक भक्तांनी उपस्थित रहावे, असे अवाहन जि.प.सदस्य ॲड.. प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.

असं या निवेदनात म्हटलंय .मराठा समाजाच्या भावना त्यांच्या वक्तव्यामुळे तीव्र झाल्या आहेत .त्यामुळे महंत नामदेव शास्त्री यांनी आपले वक्तव्य मागे घ्यावे .हे वक्तव्य त्यांनी मागे घेतले नाही तर त्यांच्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे असेही या निवेदनात म्हंटलंय.

## अबॅकस राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेत श्री शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश!



बीड (दिनांक ०४ फेब्रुवारी):अबॅकस राष्ट्रीय चॅम्पियनशिप स्पर्धेत श्री शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करूनशाळेच्या नावलौकिकात भर टाकली आहे. या बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या अबॅकस नॅशनल चॅम्पियनशिप स्पर्धा मध्ये बीड येथील श्री शिवाजी विद्यालयातील विद्यार्थी यांनी घवघवीतयश संपादनकेले. चि. सार्थक बाळासाहेब वैद्य इयत्ता सातवी क सेकंड लेव्हल मध्ये चौदावा वा क्रमांक मिळवला. कु.आघाव सृष्टी रामदास सातवी हिने फोर्थ लेवल मध्ये सुपरस्टार म्हणून क्रमांक मिळाला आहे. कु. ठोंबरे जानवी प्रमोद सातवीच्या विद्यार्थिनीने सेकंड लेवल मध्ये सोळावा क्रमांक पटकावला आहे. चि.भांडवलकर जय बबन हा सातवीचा विद्यार्थी सेकंड लेव्हल मध्ये आठवा आला आहे. तर चिसंभाजी महादेव कदम या सहावीच्या विद्यार्थ्याने फर्स्ट लेवल मध्ये आठवा क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव दिनकरराव कदम, कार्यकारिणीचे पवनराव चौरे पाटील, शितलताई कदम, आसाराम सुर्वे पाटील, मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उपमुख्याध्यापक राजकुमार कदम, बी. डी. मातकर,पर्यवेक्षक रमेश सुपेकर, गिरीश चाळक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## छत्रपती शिक्षण संकुलात नवीन फौजदारी कायदे संदर्भात जनजागृती अभियानाचे आयोजन.

खर्डा ( प्रतिनिधी ) पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर अंतर्गत खर्डा पोलीस स्टेशन, खर्डा द्वारे नवीन कायद्याची अंमलबजावणी संदर्भाने जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष अधिनियम २०२३. अनुक्रमे कालबाह्य भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता आणि भारतीय पुरावा कायदा याची जागा घेतील. याप्रसंगी खर्डा पोलीस स्टेशन, खर्डा. चे सपोनि विजय झंजाड यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना तीन नवीन फौजदारी कायदे संदर्भात मार्गदर्शन केले.



त्याचबरोबर बाल गुन्हेगारी, बालअत्याचार यासंदर्भात विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. चंद्रकिशोर बारटक्के, महाविद्यालय उपप्राचार्य प्रा. डॉ. शिवानंद जाधव, शशिकांत मस्के प्रा. लक्ष्मण घोडके, प्रा. आदिनाथ खेडकर, प्रा. किरण खेडकर, डॉ. भारत मेंगडे तसेच विद्यार्थी वर्ग यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. नवीन कायद्याची सर्वसामान्यांना माहिती व्हावी यासाठी, या अगोदर देखील खर्डा पोलीस स्टेशन, खर्डा द्वारे विद्यार्थी रॅली काढण्यात आली होती.

# या ५० देशांच्या जीडीपी पेक्षाही मुंबई महानगर पालिकेचे बजेट मोठे, कोणते देश?

देशाची आर्थिक राजधानी मुंबईचा आर्थिक गाडा चालविणारा अर्थसंकल्प आज सादर झाला आहे. या मुंबई महानगर पालिकेच्या अर्थसंकल्पाचा आकडा संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनला आहे. मुंबई महानगर पालिकेचा अर्थसंकल्प ७४,४२७ कोटी रुपयांचे म्हणजे सुमारे ८.५० अब्ज डॉलर इतके आहे. एवढे बजेट देशातील अनेक राज्याचे देखील नाही. खास म्हणजे जगातील सुमारे ५० असे देश आहेत, ज्यांचा जीडीपी ८.५० अब्ज डॉलर देखील नाही. या देशात मॉन्टेंगरो, मालदीव, बारबडोस, भूटान, जांबिया आदी देश आहेत. मुंबईचा अर्थसंकल्पाचा आकडा इतका मोठा का आहे. जगात असे कोणते देश आहेत ज्यांचा जीडीपी मुंबई महानगर पालिकेच्या बजेट पेक्षा कमी आहे. देशातील सर्वात श्रीमंत महानगर पालिका असलेल्या मुंबई महानगर पालिकेने साल २०२५-२६ साठीचे ७४,४२७ कोटी रुपयाचे बजेट सादर केले आहे. ७ मार्च २०२२ रोजी नगरसेवकांचा कार्यकाल संपल्यानंतर महानगर पालिकेवर आता प्रशासकाचे राज्य आहे. मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या मते मुंबई महानगर पालिकेने सादर केलेले हे आतापर्यंतचे सर्वात मोठे बजेट आहे. यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत महसूलात ७,४१० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. ४३,१६६ कोटी रुपये भांडवली खर्चासाठी राखून ठेवले आहेत,ते एकूण बजेटच्या ५८ टक्के आहेत. रस्त्याच्यां क्राँक्रिटी करणाचे काम ज्या एजन्सींना देण्यात आले आहे त्यांच्यानुसार, आयआयटी मुंबई शहरातील काँक्रिटीकरणाच्या कामांवर लक्ष ठेवणार आहे. पावसाळ्याचा कामात व्यत्यय येऊ नये म्हणून हे काम ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण केले जाणार



आहे. आरोग्य सेवांवर बजेटच्या १० टक्के रक्कम खर्च करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. आरोग्य सेवा आपल्या दारी योजनेअंतर्गत मुंबईभर घरोघरी आरोग्य तपासणी सुरू करण्याची योजना बीएमसीने आखली आहे. अनेक देशांचा जीडीपी देखील इतका नाही मुंबई महानगर पालिकेचे वार्षिक बजेट इतके मोठे आहे की अनेक देशांचा जीडीपी देखील तेवढा नाही. भूतान देशाचा जीडीपी ३ अब्ज डॉलरपेक्षा थोडा अधिक आहे. फिजीच्या एकूण देशाचा जीडीपी ५.८ अब्ज डॉलर आहे. मालदीवचा एकूण जीडीपी ७.१ अब्ज डॉलर आहे. बार्बोडोसचा एकूण जीडीपी ६.८ अब्ज डॉलर आहे. मॉन्टेंगरो सारख्या देशाचा जीडीपी ८ अब्ज डॉलर आहे. तर मुंबई महानगर पालिकेचा जीडीपी ८.५ अब्ज डॉलर आहे. असे जगातील ५० देश असे आहेत ज्यांचा जीडीपी सध्या मुंबई महानगर पालिकेच्या बजेटपेक्षा कमी आहे.शिक्षणासाठी खर्च मुंबई महानगर पालिककडे ४७० शाळा आहे. ज्यातील ४५ शाळांचा आधुनिकीकरण सुरु आहे. ही प्रक्रीया मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होणार आहे. तर ३६ शाळांचे आधुनिकरण पुढच्या पूर्ण होणार आहे. ७,९३४ तुकड्यांपैकी ३८१४ तुकड्यांना आधीच डिजिटल केले आहे. मुंबई महानगर पालिकेने शिक्षक पदासाठी ६२२ उमेदवारांना नियुक्तीपत्र जारी केले आहे. १०० पालिका शाळांमध्ये जैविक शेती उद्यान उभारण्यात येणार आहेत.पर्यावरणावर खर्चप्रदुषणाची समस्या दूर करण्यासाठी पालिकेने आपल्या २४ वॉर्डात १०० बॅटरी सक्शन मशीन लावण्याचा निर्णय घेतला आहे. बेकरींना पारंपारिक लाकडांऐवजी सीएनजीवर चालविण्याची योजना आहे. कांजूरमार्ग येथील डम्पिंग ग्राऊंडमधील कच-यापासून वीज निर्मितीची योजना आकाराला येत आहे. मुलुंड येथील डम्पिंग ग्राऊंड पालिका पुन्हा ताब्यात घेणार आहे. २४ हेक्टर जागेला पुन्हा प्राप्त करण्यासाठी जून २०२५ पर्यंत एकूण ७० लाख मेट्रीक टन जुना कचरा साफ करून त्याचा निपटारा करण्याचा निर्णय घेतला आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ५ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

### असे काढले जाते फार्मर आयडी



मुंबई : केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजानंचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणं आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून अॅग्रीस्टॅक या डिजीटल उक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे. महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना अॅग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. फार्मर आयडीसाठी नोंदणी कुठं करायची? कोणती कागदपत्रं असणं आवश्यक आहेत शेतकऱ्यांना माहिती असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी काढण्यासाठी लागणारी कागदपत्रं : केंद्र व राज्य सरकारकडून शेती विषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करु शकता. कोणत्या योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी आवश्यक? पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभा हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलं नाही तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळं नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणं आवश्यक आहे. अॅग्रीस्टॅक प्रकल्प नेमका काय? अॅग्रीस्टॅक हे असं डिजीटल फाऊंडेशन असेल ज्याद्वारे डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलं जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना डिजीटल ओळखपत्र दिलं जाईल. त्यामध्ये त्यांच्या शेतीसंदर्भातील माहितीचा समावेश असेल. अॅग्रीस्टॅक हा प्रकल्प बीड जिल्ह्यात राबवण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्यानं नोंदणीचे तीन संच असतील. यामध्ये शेतकऱ्यांचा आणि त्याच्या शेतांचा आधार संलग्न नोंदणी संच, भूसंदर्भिकृत व्याप्त दर्शवणारा गाव नकाशांचा नोंदणी संच, हंगामी पिकांचा नोंदणी संच असेल. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेसाठी देखील फार्मर आयडी आवश्यक शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी १९ व्या हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे.

# सात शेतीमालाच्या वायदेबंदीला दोन महिन्यांची मुदतवाढ



मुंबई : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन अर्थसंकल्पात सात शेतीमालाच्या वायद्यांवरील बंदी उठवेल, अशी अपेक्षा होती. मात्र सेबीने वायदेबंदीला पुन्हा मुदतवाढ देत ३१ मार्च २०२५ पर्यंत केली. वायदेबंदीमुळे महागाई वाढत नाही शिवाय वायद्यांमुळे किंमत जोखिम व्यवस्थापन शक्य होते आणि भविष्यातील किमतीचा अंदाज बांधता येतो, असे अनेक अभ्यासातून सिध्द झाले. तरीही सरकारने वायदेबंदीला दोन महिन्यांची मुदतवाढ दिली. सात शेतीमालाच्या वायद्यांवर डिसेंबर २०२१ मध्ये वायदेबंदी केली होती. यात सोयाबीनसह सोयातेल आणि सोयापेंड, मोहरीसह मोहरीतेल आणि मोहरीपेंड, कच्चे पाम तेल, हरभरा, गहू, बिगर बासमती तांदूळ तसेच मुगाचा समावेश आहे. नुकतेच सरकारने वायदेबंदीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली होती. वायदेबंदीची मुदत ३१ जानेवारी आणि केंद्राचा अर्थसंकल्प १ फेब्रुवारीला होता. त्यामुळे अर्थमंत्री निर्मला सितारामन अर्थसंकल्पात वायदेबंदी उठवल्याची घोषण करतील अशी अपेक्षा व्यक्त केली होती. विशेष म्हणजे सरकारने जे कारण देत वायदेबंदी केली होती, ती परिस्थिती बाजारात नाही. वायद्यांमुळे शेतीमालाच्या भावात अवास्तव भाववाढ होते, असे कारण देत वायदेबंदी केली होती. पण मागील तीन वर्षात वायदेबंदी असतानाही अनेक शेतीमालाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेही आणि पडलेही. सध्या सोयाबीन, हरभरा, मूग, मोहरी या शेतीमालांचे भाव कमी झाले आहेत. त्यामुळे सरकार वायद्यांवरील बंदी उठवेल, अशी अपेक्षा होती. अर्थमंत्री अर्थसंकल्पात याविषयीची घोषणा करतील, अशी शक्यता होती. कारण आर्थिक पाहणी अहवालातही शेतीमाल बाजारातील जोखीम कमी करण्यासाठी वायदेबाजारासारख्या साधनांचे अप्रत्यक्ष समर्थन करण्यात आले होते. मात्र सरकारने पुन्हा एकदा शेतकरी आणि व्यापाऱ्यांची निराशा केली.

### बाजार सुधारणांच्या नुसत्याच गप्पा

सोयाबीनसह बहुतांशी शेतीमालाचे भाव पडले आहेत. त्यामुळे वायदे सुरु करण्याची गरज आहे.सरकार एकीकडे मात्र बाजार सुधारणांच्या गप्पाकरते आणि दुसरीकडे वायदे बाजार चालू देतनाही, अशी टिका शेतकरी करत आहेत.

## श्री.कैलास दहातोंडे यांची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्य सरचिटणीस पदी निवड झाल्याबददल अभिनंदन - बाळराजे तळेकर

## ग्रामविकास मंत्री ना.श्री. जयकुमार गोरे भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंदवले ता. माण जि. सातारा या ठिकाणी महामंडळ सभा संपन्न...

शिक्षक नेते श्री.संभाजीराव थोरात तात्या यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असणा-या महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची महामंडळ सभा नुकतीच गोंदवले ता. माण जि. सातारा याठिकाणी ग्रामविकास मंत्री ना.श्री.जयकुमार गोरे भाऊ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाली. यावेळी प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्यभरातील सर्व प्रमुख पदाधिका-यांची उपस्थिती होती. यावेळी सर्वानुमते मराठवाड्याचे भूमिपुत्र, युवा अभ्यासू शिक्षक नेतृत्व श्री. कैलास दहातोंडे यांची एकमताने राज्य सरचिटणीस पदी निवड करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे राज्यभरातून अभिनंदन होत आहे. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्राथमिक शिक्षक संघाच्या प्रमुख पदाधिका-यांसह सातारा जिल्ह्याचे माजी खासदार श्री. रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार श्री.अतुल भोसले, आमदार श्री.मनोज दादा घोरपडे, आमदार



श्री.सचिन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ ही लाखो सभासद असणारी राज्यातील एक प्रमुख संघटना असून गेली तीस वर्षे या संघटनेचे नेतृत्व श्री. संभाजीराव थोरात तात्या हे करतात. प्राथमिक शिक्षक संघ ११० वर्षाचा इतिहास असणारी, स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली संघटना असून, यापूर्वी या संघटनेचे नेतृत्व कर्मवीर भाऊराव पाटील अण्णा, आचार्य अत्रे, आचार्य दोंदे, ग.श्री. खैर, शिवाजीराव पाटील अण्णा अशा नामवंत व्यक्तिमत्त्वांनी केलेले आहे. त्यामुळे प्रमुख पदाधिका-यांच्या निवडीकडे राज्याचे लक्ष लागलेले असते. अशा या भव्य दिव्य व ऐतिहासिक व्यासपीठावर मराठवाड्याचे भूमिपुत्र श्री.कैलास दहातोंडे यांची राज्य सरचिटणीस पदी एक मताने निवड झाली आहे, ही बाब मराठवाड्यासाठी भूषणावह असून राज्यभरातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे. कैलास दहातोंडे गेली वीस वर्षापासून प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न राज्यस्तरावर अभ्यासपूर्वक मांडून सोडवून घेण्यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे राज्याने पाहिले आहे. ते एक अभ्यासू व शांत संयमी व्यक्तिमत्व असल्यामुळेच मराठवाड्याला हा बहुमान मिळाला आहे. मराठवाडाच नाही तर राज्यभर त्यांचा खूप मोठा मित्रपरिवार असून ते शिक्षणासोबतच सामाजिक कार्यामध्येही अग्रेसर असतात. शिक्षकांचे प्रश्न सोडवत असतानाच राज्यभरातील गोरगरीब, वाडी, वस्ती, तांडा व खेडेगावातील विद्यार्थ्यांना दर्जेदार भौतिक सुविधा व शिक्षण मिळावे यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात. शासन दरबारी विद्यार्थी, शिक्षक व शाळा यांचे अभ्यासपूर्वक प्रश्न मांडून सोडवून घेण्याची कला त्यांच्याकडे असल्यामुळे या निवडीचे राज्यभरातून मोठ्या आनंदाने स्वागत झाले आहे. त्यांचे मनस्वी अभिनंदन! व पवित्र अशा शिक्षण क्षेत्रातील वाटचालीस खूप सा-या शुभेच्छा...!!

# उन्हाळी हंगामासाठी सूर्यफुल लागवड तंत्रज्ञान

शेतकऱ्यांकडून लागवड केल्या जाणाऱ्या बहुतांशी पिकांची ठराविक हंगामातच उदा. ज्वारीखरीप व रब्बी, तुर खरीप, भुईमूग-खरीप व उन्हाळी, गहु, हरभरा, करडई-फक्त रब्बी इत्यादी तसेच यांच्या पेरणीचा कालावधीही ठरलेला आहे. पीक वाढीच्या दरम्यान देखील या पिकांच्या हवामानाच्या गरजा ठरलेल्या आहेत. यात बदल झाल्यास पीक वाढीवर अनिष्ट परिणाम होतो. सुर्यप्रकाशाच्या तीव्रतेचा परिणाम न होणारे हे पीक कोणत्याही हंगामात तसेच कोणत्याही कालावधीत लागवडीखाली घेतले जाते. याचा पिकाच्या उत्पादनावर कोणताही अनिष्ठ परिणाम होत नाही. जमीन : सूर्यफुल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन निवडावी. आम्लयुक्त व पाणथळ जमिनीत हे पिक चांगले येत नाही. पूर्वमशागत : जमिनीची खोल नांगरट करुन त्यानंतर कुळवाच्या उभ्या आडव्या दोन ते तीन पाळ्या घ्याव्यात. शेवटच्या कुळवाच्या पाळीपूर्वी हेक्टरी २० ते २५ गाड्या चांगले कुजलेले शेणखत घालावे. पेरणीची वेळ/पेरणीचे अंतर/पेरणी पध्दत : उन्हाळी हंगामातील लागवडीकरिता फेब्रुवारीचा पहिला पंधरवडा हि पेरणीची उत्तम वेळ आहे. बागायती पिकाची लागवड



सरी वरंबा वरंब्यावर टोकण पध्दतीने करावी. मध्यम ते खोल जमीन - ४५ ३० सें.मी. भारी जमीन - ६० ३० सें.मी. संकरीत वाण - ६० ३० सें.मी. बियाणे : सुर्यफुलाचे पेरणीसाठी सुधारीत वाणाचे ८-१० किलो तर संकरीत वाणाचे ५-६ किलो बियाणे प्रती हेक्टरी वापरावे. बीजप्रक्रिया : मर रोगाच्या प्रतिबंधासाठी २ ते २.५ ग्रॅम थायरम किंवा ग्रासिकॉल प्रति किलो बियाण्यास चोळावे., केवडा रोग टाळण्यासाठी ६ ग्रॅम अॅप्रॉन ३५ प्रती किलो बियाण्यास चोळावे., तसेच विषाणुजन्य (नेक्रॉसीस) रोगाच्या प्रतिबंधासाठी इमिडॅक्लोप्रिड ७० डब्ल्यू.ए. गाऊचा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास लावावे., त्यानंतर अँझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणु खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे. रासायनिक खते : बागायती पिकास प्रति हेक्टरी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश द्यावे व उरलेल्या ३० किलो नत्राची मात्रा पेरणीनंतर एक महिन्याच्या आत द्यावी. गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीसाठी प्रति हेक्टरी २० किलो गंधक पेरणीच्या वेळी गांडुळ खतातून द्यावे. आंतरमशागत : पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी दोन रोपातील अंतर ३० सें.मी. ठेवून विरळणी करावी. पेरणीनंतर १५ दिवसांनी एक खुरपणी करावी. तसेच दोन कोळपण्या कराव्यात. पहिली कोळपणी पेरणीनंतर २० दिवसांनी व दुसरी कोळपणी ३५ ते ४० दिवसांनी करावी. पाणी व्यवस्थापन : सुर्यफूलाच्या पिकास संवेदनक्षम अवस्थेत पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. सुर्यफुलाच्या संवेदनक्षम अवस्था जसे की १. रोप अवस्था २. फुलकळी अवस्था ३. फुलो- याची अवस्था ४. दाणे भरण्याची अवस्था या संवेदनशील अवस्थेत पाण्याचा ताण पडू देऊ नये. फुलकळी अवस्था ते दाणे भरण्याच्या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास दाणे पोकळ राहतात व उत्पादनात घट येते.

पीक संरक्षण : विषाणुजन्य रोग हा रस शोषणा- या फुलकिड्यांमार्फत होतो. त्यांच्या नियंत्रणासाठी इमिडोक्लोप्रीड २०० एस. एल. २ मि.ली. प्रती १० लीटर पाणी या प्रमाणात पेरणीनंतर १५ दिवसांच्या अंतराने तीन वेळा फवारण्या कराव्यात. मावा व तुडतुडे यांच्या नियंत्रणासाठी डायमिथेएट ३० प्रवाही ०.०३ टक्के फवारावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ३५ प्रवाही ७०० मिली किंवा क्विनॉलफॉस २५ प्रवाही १००० मिली ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी वापरावे. केसाळ अळीच्या नियंत्रणासाठी अळ्यांचे पुंजके येथून रॉकेल मिश्रीत पाण्यात टाकुन त्यांचा नाश करावा किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के किंवा कार्बारिल १० टक्के भुकटी २५ किलो प्रति हेक्टरी बारा शांत असताना धुरळावी. जैविक किड नियंत्रण सुर्यफुलावरील पाने खाणारी अळी, केसाळ अळी, घाटे अळी यांच्या नियंत्रणासाठी एच.एन.पी.व्ही. या विषाणुंची फवारणी करावी. काढणी:सुर्यफुलाची पाने,देठ व फुलाची मागील बाजु पिवळी झाल्यानंतर पिकाची कापणी करावी. कणसे चांगली वाळवून नंतर मळणी करावी. उत्पादन : संकरीत वाणापासून १२ ते १५ क्विंटल आणि बागायती संकरीत वाणापासून प्रतिहेक्टरी १५ ते २० क्विंटल उत्पादन मिळते. विशेष बाबी : पीक फुलो-यात असतांना सकाळी ७ ते ११ या वेळेत हाताला तलम कापड गुंडाळून फुलाच्या तबकावरुन हळुवार हात फिरवावा म्हणजे कृत्रिम परागीभवन होऊन दाणे भरण्याचे प्रमाण वाढते. सुर्यफुलाच्या फुल उमलण्याच्या अवस्थेत व त्यानंतर आठ दिवसांनी २ ग्रॅम बोरॅक्स प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे दाणे भरण्याचे प्रमाण व दाण्याचे वजन वाढते. परागीभवन होण्यासाठी प्रति हेक्टरी ४-५ मधमाश्यांच्या पेट्या ठेवाव्यात. सूर्यफूल पिकाची फेरपालट करावी. सुर्यफूलाची मुळे जमिनीत खोलवर जातात.

दरवर्षी त्याच जमिनीत वारंवार हे पीक घेतल्यास जमिनीचा पोत बिघडून उत्पादन क्षमता कमी होते. तसेच रोग व किडीचा प्रादुर्भाव वाढतो. त्यासाठी कमीत कमी ३ वर्षे तरी त्याच जमिनीत सुर्यफुलाचे पीक घेवू नये. पीक फुलोऱ्यात असतांना किटकनाशकाची फवारणी करु नये. अगदीच आवश्यक असेल तर एन्डोसल्फान ३५ प्रवाही या किटकनाशकाची संध्याकाळच्या वेळेस फवारणी करावी.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ५ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# पर्यवेक्षिका चंद्रकला जाधव यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा

माजलगाव । येथील चंद्रकला पांडुरंग परसोडे (जाधव मॅडम) या दि ३१ जानेवारी रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या.त्यांचा सेवपुर्ती गौरव सोहळा धारुर तालुका अंगणवाडी मदतनीस कर्मचारी संघटनेच्या वतीने दि ०१ फेब्रुवारी रोजी धारुर तालुक्यातील हिंगणी येथे संपन्न झाला. चंद्रकला परसोडे (जाधव मॅडम ) या अंगणवाडी पर्यवेक्षिका या धारुर तालुक्यातील मोहखेड व तेलगाव विभाग येथे कार्यरत होत्या.त्या नियत वयोमानानुसार दि ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाल्या.त्यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा धारुर तालुका अंगणवाडी व मदतनीस कर्मचारी संघटनेच्या वतीने दि ०१ फेब्रुवारी रोजी धारुर तालुक्यातील हिंगणी येथे संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून हिंगणी येथील सरपंच योगेश सोळंके यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्य बाळराजे सोळंके, वंचीत बहुजन आघाडीचे जिल्हा कोषाध्यक्ष अंकुशराव जाधव, अंगणवाडी मदतनीस कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती शामलताई जोगदंड,तलाठी शेजाळ,विकास वाव्हळे, सेवानिवृत्त सौनिक दत्तात्रय वाव्हळे,रंजित रुपणर,बाळासाहेब चोपडे,रवी उजगरे,अशोक पैळ यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी चंद्रकला परसोडे यांना सेवापुर्ती सोहळ्या निमित्ताने शिक्षक सिध्दार्थ जाधव,करुणा टाकणखार, मिनाक्षी जावळे,किरण प्रधान, बनसोडे मॅडम यांनी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन एस.बी.आय.फाऊडेंशनचे एकनाथ शिंदे यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माया डोंगरे,सुमनबाई बडे,विजयमाला कांबळे,सरस्वती पुरी,विद्या सोळंके,प्रभावती शिंदे,संगिता जाधव,सुरेखा निर्मळ,उषा तिडके,प्रतिक जाधव व तेलगाव विभागातील अंगणवाडी सेविकांनी परिश्रम घेतले.

## गावात बसविले १५ सीसीटीव्ही कॅमेरे

गावाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मुरमा (ता.पैठण ) येथे ग्रामपंचायतीच्यावतीने गावातील लहान मोठ्या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. गावातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सह गावातील विविध १५ ठिकाणी कॅमेरे लावण्यात आले आहे. ग्रामपंचायत कार्यालयातून कॅमेऱ्यांचे नियंत्रण केले जाणार आहे. गावात मागील काळात चोरांनी धुमाळूक घातला होता. अनेक छोट्या-मोठ्या चोऱ्यांसह वाहन चोरीचे प्रकार घडले होते. यातून गावात असुरक्षिततेचं वातावरण होते. यावेळी प्रभारी सरपंच उषा दिनकर मापारी यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी गावाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गावात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा निर्णय घेतला. गावातील बहुतांश नागरिक शेतकरी व व्यावसायिक आहेत. त्यामुळे दिवसा गावात शुकशुकाट असतो. त्यामुळे गावातील सुरक्षेचा प्रश्न सोडवण्यासाठी लहान मोठ्या सर्वच रस्त्यावर, ग्रामपंचायत कार्यालय, गावातील शाळा, गावातील मुख्य प्रवेशद्वार असलेल्या वेशीवर आदी ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. यामुळे गाव सुरक्षित झाल्याचे वाटत आहे.

## धनंजय मुंडेंच्या आरोपांची पक्षांतर्गत चौकशी होणार

: उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मोठा निर्णय घेतला आहे. बीड प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांची चौकशी करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. मागील दोन वर्षात झालेल्या कामांची चौकशी होणार आहे. नियोजन विभागाने तयार केलेली समिती याचा एका आठवड्यात अहवाल देणार आहे. मागील दोन वर्ष धनंजय मुंडे बीडचे पालकमंत्री होते. तसेच आता धनंजय मुंडेंच्या आरोपांची पक्षांतर्गत चौकशी होणार



असल्याचेही अजित पवारांनी सांगितले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंत्री धनंजय मुंडेंना मोठा धक्का बसला आहे. धनंजय मुंडेंवरील आरोपांची आता आता चौकशी होणार आहे. यासाठी एक समिती नेमली आहे. अजित पवारांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. धनंजय मुंडेच्या चौकशीसाठी अजित पवारांनी पक्षांतर्गत समिती नेमली आहे. तसेच सुरेश धसांच्या ७३ कोटींच्या आरोपांची चौकशी होणार आहे.

## धनंजय मुंडेंनी रेशन दुकानां मार्फत सर्वसामान्यांवर अन्याय

राज्यातील सर्व रेशन दुकानांवर गहूऐवजी खडे मिश्रीत ज्वारीचे वितरण करण्यात येणार आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरीकांची चेष्टा करण्याचे काम अन्न व पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी करु नये, रेशन दुकानावर ज्वारीचे वितरण करण्यापेक्षा गहुचे वितरण करावे असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या महिला शहराध्यक्ष श्रीमती गुलरुख जहीन (राणीताई) यांनी पत्रकाद्वारे केले आहे. गरीब सर्वसामान्यांचे कुटूंब हे रेशन दुकानावर मिळणार्या अन्नधान्यावर अवलंबून असते, सरकारने गरीबांची चेष्टा लावली असून गहूऐवजी खडे मिश्रीत ज्वारीचे वितरण करण्यात येत असल्यामुळे नागरीकात संताप व्यक्त होत आहे. आगामी काळात मुस्लिमांचा पवित्र रमजान असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारची कीट मिळत नाही, अन् अपेक्षाही नाहीत परंतु आहे ते चांगल्या प्रकारे अन्नाचे वाटप करावे हीच अपेक्षा सर्वसामान्यांना आहे. सध्याची सरकार आंधळी असून तिला डोळे नाही अन् कानही नाही अशीच अवस्था झाल्याचेही श्रीमती गुलरुख जहीन (राणीताई) यांनी म्हटले आहे. अन्न व पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन खराब ज्वारीचे वाटप बंद करुन चांगल्या दर्जाचे गहू वाटप करावेत व रस्त्यावर उतरण्याची वेळ येऊ देवू नका असेही गुलरुख जहीन (राणीताई) यांनी पत्रकात म्हटले आहे.

# चोरांचा सोडा हात ठेवीदारांना द्या साथ

### उपासमारीची वेळ न्याय कोणाला मागावा

केज तालुक्यातील यवता येथील सतीश लक्ष्मण जोगंदड हे दोन्ही पायांनी अपंग आहेत. पण त्यांनी भीक न मागता गावातच पंचर काढण्याचे दुकान चालवितात. यातून एक-एक रुपया जोडून ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये २ लाख आणि साईराम मध्ये २ लाख अशा एकूण ४ लाखांच्या ठेवी ठेवल्या आहेत. लेकरांचे शिक्षण सुरू असून, पैशा अभावी त्यांचे शिक्षण थांबविण्याची वेळ आली असून, कधी धंदा चालतो तर कधी नाही यामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आली असून, न्याय मागावा कोणाकडे असा प्रश्न या अपंग ठेवीदारांने पानावलेल्या डोळ्यांनी बोलताना उपस्थित केला.

जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेट संस्थांनी रातोरात गाशा गुंडाळून लाखो ठेवीदारांची फसवणूक केली. मेहनतीने कमवलेला पैसा या मल्टीस्टेट मध्ये अडकून पडला आहे. यामुळे अनेकजण रस्त्यावर आले आहेत. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी जिल्ह्यातील ठेवीदारांनी मचोरांचा सोडा हात ठेवीदारांना द्या साथफ म्हणत आज जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली जन आक्रोश मोर्चा काढून आपल्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. जिल्ह्यात ज्ञानराधा, साईराम, शुभ कल्याण, राजस्थानी, जिजाऊ, मोतीश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, भराठवाडा अर्बन या मल्टीस्टेट दिवाळखोरीत निघाल्या आहेत. लोकांच्या घामाच्या पैशावर या संस्था चालकांनी मजा मारली ठेवी मागण्यास आल्यानंतर ठेवी परत न देऊ शकल्याने



रातोरात पळून गेले होते. यामुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील लाखो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकून पडले आहेत. यामुळे अनेकांच्या लेकरांचे शिक्षण, लग्न थांबले आहेत. काहींना वेड लागण्याची वेळ आली आहे. यातील काही संस्था चालक अटक आहेत. पण ठेवीदारांचे हक्काचे पैसे मिळणार कधी आसा प्रश्न उपस्थित केला जात असून, याकडे कोणाचेच लक्ष नाही. यामुळे संतप्त ठेवीदारांनी प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली आज भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय असा जन आक्रोश मोर्चा काढला यावेळी पालकमंत्री अजित दादा न्याय द्या, सर्व मल्टीस्टेटची एसआयटी मार्फत चौकशी करा, ठेवीदारांचा संघर्ष योध्दा सचिन भैय्या उबाळे, चोरांचा सोडा हात ठेवीदारांना द्या साथ, मल्टीस्टेट संचालकांचा धिक्कार असो, अर्चना कुटेला अटक करा, मल्टीस्टेटच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन प्रॉपर्टी जप्त करा असे फलक हातात होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकल्यानंतर मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या मोर्चात मोठ्या प्रमाणात ठेवीदार सहभागही झाले होते.

# शिक्षक बी.बी.घुमरे यांचा सेवापुर्ती समारंभ

येथील विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे गणित विषयाचे शिक्षक बी.बी. घुमरे हे दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा शाळेच्या वतीने सेवागौरव सोहळा आयोजीत करण्यात आला होता. विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पेठ बीड येथील सहशिक्षक बी.बी.घुमरे आणि वाघमारे एस.बी. हे दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा सेवागौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.जाधव एम.सी. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे कार्यवाहक राऊत एम.ए., विनायक प्राथमिक विद्यालयाच्या



मुख्याध्यापिका किर्तीताई पांगारकर, विनाताई भोज, मोहनराव सिरसाट, मुख्याध्यापक प्रदिप जगताप, अभिषेक राऊत, धनवंत मस्के, सुधाकर तांदळे, रावसाहेब भोसले. आदि उपस्थित होते. यावेळी प्रथम मान्यवरांच्या हस्ते स्व.केशरकाकू क्षीरसागर व कर्मयोगी स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पन करण्यात आला. विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सर्वश्री घुमरे, वाघमारे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांनी दोन्ही सेवानिवृत्त शिक्षकांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.जाधव एम.सी. यांनी सर्वश्री घुमरे व वाघमारे यांनी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. यावेळी उपमुख्याध्यापक रियाज बेग, पर्यवेक्षक सुहास अमरापुरकर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद नरवडे यांनी केले. शेवटी राजेंद्र गाडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## कालिकादेवी महाविद्यालयाने राज्यस्तरीय स्पर्धेत दोन पारितोषिक पटकावून घवघवी यश प्राप्त

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. भीमरावजी धोंडे यांच्या माता - पिता यांच्या स्मृती पित्यार्थ गंगाई बाबाजी महोत्सव २०२५ दिनांक ३० व ३१ जानेवारी २०२५ रोजी अंतर महाविद्यालय राज्यस्तरीय खुल्या वकृत्व काव्यवाचन व लावणी महोत्सवाचे आयोजन भगवान महाविद्यालय आष्टी येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत कालिकादेवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला या स्पर्धेत अंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत राजश्री ब्रह्मदेव जाधव या विद्यार्थिनी द्वितीय पारितोषिक रुपये ५००१ व सन्मानचिन्ह मिळविले. तसेच आंतर महाविद्यालयीन




राज्यस्तरीय खुल्या लावणी स्पर्धेत उमेश कुलथे व पुष्पा घाडगे या विद्यार्थ्यांनी तृतीय पारितोषिक रुपये ९००१ व सन्मानचिन्ह मिळविले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. धम्मपाल घुंबरे, प्रा. प्रिती विधाते, डॉ. नवनाथ पवळे, डॉ. संजय सावते, गणेश आडगावकर, सुधीर येवले व ज्ञानेश्वर येवले तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

## पालकमंत्र्याच्या पत्रकार परिषदेवर व्हाईस ऑफ मीडियाचा बहिष्कार

जालना। प्रतिनिधी आज दि.१ शनिवार रोजी जालन्यात जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये जिल्हा नियोजन समितीची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकी दरम्यान पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः पत्रकारांना नियोजन बैठकीतून बाहेर जाण्यास सांगितले. वास्तविक पाहता २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त पंकजा मुंडे या जालन्यात असताना त्याच वेळी पत्रकारांनी नियोजन बैठकी मध्ये पत्रकारांना प्रवेश देण्याची मागणी केली होती. परंतु आज पालकमंत्र्यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक सुरु होण्यापुर्वी स्वतः पत्रकारांना बाहेर जाण्यास सांगितल्याने जिल्हा नियोजन बैठकीमध्ये वार्तांकन करण्यासाठी पत्रकारांना वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा निषेध करून त्यांना बीडला पाठवा, तसेच स्थानिक आमदारांना जालन्याचे पालकमंत्री करा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी पत्रकारांनी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या पत्रकार परिषदेवर बहिष्कार घालून त्यांच्या बातम्यांवर वार्तांकन न करण्याचे जाहीर केले.

# वातावरण तापलं, धनंजय मुंडे अंजली दमानियांवर दाखल करणार फौजदारी खटला

मोठी बातमी समोर येत आहे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडून सातत्यानं मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत, या विरोधात आता मुंडे देखील चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यांनी दमानिया यांच्या विरोधात अब्रु नुकसानीचा फौजदारी खटला दाखल करण्याचा इशारा दिला आहे, याबाबत ट्विट करत त्यांनी माहिती दिली.

नेमकं काय म्हणाले मुंडे?

ङ्गअंजली दमानिया यांनी आज पुन्हा दिवसातून दुस-यांदा पत्रकार परिषद घेत माझ्यावर खोटे व बेछूट



आरोप केले आहेत. मी पुन्हा एकदा स्पष्ट करू इच्छितो की, कृषी विभागातील तत्कालीन खरेदी प्रक्रिया नियमातील तरतुदीनुसार व मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अंतिम मान्यतेनंतरच झाली आहे, त्यानंतरच पुढील कार्यवाही सुरु झाली. यांसह इतर अनेक मोघम आरोप करणा-या दमानिया ताई यांच्यावर मी लवकरच फौजदारी अब्रु नुकसानीचा खटला मुंबई उच्च न्यायालयात दाखल करणार आहे.फ असा इशारा यावेळी धनंजय मुंडे यांनी दिला आहे.

### दमानियांची पहिली प्रतिक्रिया

दरम्यान धनंजय मुंडे यांनी खटला दाखल करणार असल्याचा इशारा दिल्यानंतर आता दमानिया यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांना जर अब्रु नुकसाणीचा दावा दाखल करायचा असेल तर ते करू शकतात. मात्र खटला जर दाखल केला तर त्यांचीच अब्रु जाईल असं दमानिया यांनी म्हटलं आहे. माझ्या दुस-या पत्रकार परिषदेमध्ये तर मी एक-एक मुद्दा वाचून दाखवला असंही यावेळी दमानिया यांनी म्हटलं आहे.

# अभिनेते राहुल सोलापूरकरांना मेंटल हॉस्पिटलमध्ये भरती करण्याची मागणी

# शिवरायांबद्दल वादग्रस्त वक्तव्य,

### सुषमा अंधारे काय म्हणाल्या?

राहुल सोलापूरकर यांच्या वक्तव्यावर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे म्हणाल्या, 'ही तीच पिलावळ आहे, ज्यांना या मातीतील चार्वाक, बसवेश्वर, बुद्ध, छत्रपती शिवराय, विश्वरत्न बाबासाहेब, म. ज्योतिबा फुले, म. गांधी हे आदर्श मोडीत काढून गोळवलकर, हेडगेवार, मुखर्जी हे नवे आदर्श प्रस्थापित करायचे आहेत. हे सांस्कृतिक राजकारण ओळखा,' असं ट्विट त्यांनी केलंय.

इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्र्याहून सुटकेचा प्रसंग सर्वांनाच माहीत असेल. विविध पुस्तकं, कादंब-या यांमधून हा प्रसंग अनेकांच्या वाचनाततही आला असेल. मात्र आता याच प्रसंगावरून एका ज्येष्ठ मराठी अभिनेत्याने केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे. आग्र्याहून सुटका करून घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणत्याही पेटा-यांचा वापर केला नव्हता, तर त्यांनी चक्क औरंगजेबाच्या सरदारांना लाच दिली होती, असं वादग्रस्त वक्तव्य अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केलं आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत



त्यांनी हा दावा केला असून त्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. सोलापूरकर यांच्या या वक्तव्यावरून राजकीय क्षेत्रातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. राहुल सोलापूरकर यांचं डोकं फिरलंय, त्यांना ठाण्याच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये टाका, असं रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात म्हणाले.राहुल सोलापूरकर यांनी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल चुकीचं वक्तव्य केलं आहे. याचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, सचिन खरात गट पक्ष जाहीरपणे निषेध करत आहे. मुळात यांच्या मनातच बहुजन राजांबद्दल द्वेष आहे, हे त्यांच्या वक्तव्यातून जाणवतं. पण आता भाजप सरकार आल्यापासून यांच्या मनातील खरे विचार उफाळून येत आहेत. त्यामुळे राहुल सोलापूरकर यांची ब्राह्मणवादी मानसिकता बाहेर आली. त्यांचं डोकं फिरलय, त्यांना ठाणे मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल करा,असं सचिन खरात म्हणाले.

### राहुल सोलापूरकर नेमकं काय म्हणाले?

छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटले, मिठाईचे पेटारे-बिटारे काही नव्हते. चक्क लाच देऊन महाराज आले आणि त्यासाठी किती हुंडा वटवल्या आहेत, याचेसुद्धा पुरावे आहेत. अगदी औरंगजेबाच्या वजिराला आणि त्याच्या बायकोलासुद्धा महाराजांनी लाच दिलेली आहे. मोहसिन खान का मोईन खान नाव आहे बहुतेक त्याचं.. त्याच्याकडून अधिकृत शिक्क्याचे परवाने घेऊन सगळे बाहेर पडलेत. स्वामी परमानंद पाच हत्ती घेऊन शेवटचे गेले, त्याच्या परवान्याची अजूनही खूण सुद्धा आहे. लोकांना गोष्टी रुपात सांगताना काहीतरी रंजक करून सांगावं लागतं. मग ती रंजकता आली की इतिहासाला छेद दिला जातो किंवा बाजूला टाकला जातो,असं सोलापूरकर एका मुलाखतीत म्हणाले.

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता
दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
बुधवार ५ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com


# खा.बजरंग सोनवणे करणार आज रेल्वे चाचणीची पाहणी

## नवगण राजुरी रेल्वे स्थानक येथे देणार भेट

बीडः अनेक वर्ष रेल्वेची बीडकरांनी प्रतिक्षा केली. ही प्रतिक्षा आता संपत असून दि.४ रोजी विघनवाडी ते राजुरी आणि आज दि.५ रोजी विघनवाडी ते बीड रेल्वेची जलदगती चाचणी होत आहे. आज दि.५ रोजी सकाळी विघनवाडी ते नवगण राजुरी रेल्वे चाचणीची खा.बजरंग सोनवणे पाहणी करणार आहेत.बीडला रेल्वे आलीच पाहिजे, अशा घोषणा मागील अनेक वर्षांपासून सुरू होत्या. यासाठी आंदोलने आणि मोर्चेही झाले. अहिल्यानगर ते बीड या २६१ कि.मी. अंतराच्या रेल्वेसाठी बीडवासियांचा गेल्या तीन दशकापासून संघर्ष सुरू आहे. पहिल्या टप्प्यात अहिल्यानगर ते नारायणडोह या ७ कि.मी. च्या अंतराचे काम पूर्ण झाले. पुढे टप्प्याने काम सुरू



होते. अंमळनेर येथे रेल्वे येऊन थांबली होती. रेल्वेपुढे अडथळ्याची शर्यत होती. सदरील आडथळे पुर्ण करण्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी लक्ष घातले आणि अडथळ्यांची शर्यत संपत आली. दि.४ फेब्रुवारी रोजी विघनवाडी ते राजुरी अशी रेल्वे चाचणी झाली तर आज ५ फेब्रुवारी रोजी राजुरी ते बीड या नवीन लोहमार्गावर हायस्पीड रेल्वेची चाचणी घेण्यात येत आहे. आज प्रत्यक्षात बीड शहरात रेल्वे जलदगतीने दाखल होणार असल्याने हा दिवस शहरवासियांसाठी सुवर्ण अक्षरांनी लिहीला जाणार आहे.आज खा.बजरंग सोनवणे हे विघनवाडी -नवगण राजुरी या मार्गात होत असलेल्या जलदगती रेल्वे चाचणीची पाहणी करणार आहेत. सकाळी ९.४५ वाजता ते नवगण राजुरी येथील रेल्वेस्थानक येथे भेट देतील, असे नियोजीत दौ-यात म्हटले आहे.

## अखेर पावसाळ्यात बदाबदा गळणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेला सुरक्षित छप्पर मिळाले



बीड : केज तालुक्यातील मौजे लव्हरी या गावापासून ५ किलोमीटर अंतरावरील हनुमान वस्ती शाळा तब्बल १२ वर्षांपासून मोडकळीस आलेल्या जीर्णावस्थेत असलेल्या गंजलेले पत्रे,फूटलेल्या फरश्या आणि पावसाळ्यात बदाबदा गळणा-या ठिकाणी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करावे लागत असे. शाळेचे मुख्याध्यापक गोकुळ सारूक यांनी शिक्षण विभागाला वारंवार पाठपुरावा करूनही शाळेच्या इमारतीसाठी बांधकाम निधी मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत असुन पावसाळ्यात पाऊस पडल्यानंतर शाळेला सुट्टी द्यावी लागत असल्याचे शिक्षकांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संपर्क साधत लक्ष देण्याची विनंती केली होती. या अनुषंगाने डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हा प्रशासन आणि शिक्षण विभागाशी लेखी निवेदनाद्वारे मागणी केल्यानंतर अखेर शाळेची दुरूस्ती करण्यात आली असुन गंजलेले पत्रे बदलुन नवे टाकण्यात आले आहेत त्यामुळे अखेर पावसाळ्यात बदाबदा गळणा-या शाळेतील विद्यार्थ्यांचा त्रास कमी होणार आहे. केज तालुक्यातील मौजे लव्हरी या गावापासून ५ किलोमीटर अंतरावरील हनुमान वस्ती शाळा ही २००६ साली तत्कालीन आ.केशवराव आंधळे यांनी डोंगरी विकास निधीतून ग्रामपंचायत साठी दिलेल्या खोलीत २०१३ सालापासून भरत होती.

# लाडक्या बहिणीच्या कुटुंबात कोणाचीही चारचाकी असेल तर योजनेतून नाव होणार बाद!

मुंबई : राज्यात लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणास लवकरच सुरूवयात होणार आहे. अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिकांच्या घरोघरी जाऊन हे सर्वेक्षण करणार असून जर लाभार्थ्यांच्या घरात चारचाकी वाहन आढळले तर लाडकी बहीण योजनेतून त्यांचे नाव रद्द केले जाणार आहे. एवढेच नाही तर पती किंवा इतर कुटुंबियांकडे जरी कार आढळली तर त्यांचे नाव हे बाद केले जाणार आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची घरोघरी जाऊन पाहणी करण्याच्या सूचना महिला व बालविकास विभागाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. राज्याच्या महिला



व बालविकास कल्याण विभागाचे सचिव अनुप कुमार यांनी सोमवारी राज्यातील सर्व जिल्हा महिला व बालविकास कल्याण अधिकाऱ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठक घेत या सूचना दिल्या आहेत. राज्यात तब्बल अडीच कोटींपेक्षा जास्त महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला आहे. या लाभ घेणाऱ्या महिलांमध्ये निकषानुसार पात्र नसलेल्या महिलांची संख्या अधिक असल्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा अपात्र लाभार्थी महिलांची संख्या कमी करण्याचा महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने आता घेत घरी जाऊन पाहणी केली जाणार आहे. त्यामुळे अपात्र महिलांना या योनेतून बाद केले जाणार आहे.या योजनेतून अपात्र महिलांनी स्वतःहून नावे मागे घ्यावे असे आवाहन करण्यात आले होते. मात्र, याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. स्वतःहून जर कोणी लाभ सोडण्यासाठी अर्ज करत असेल तर त्यांचा अर्ज वगळण्यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी यांच्या नावाने लॉगिन देखील दिले गेले होते. मात्र, काही मोजक्याच बहिणींनी त्यांची नावे या योजनेतून स्वतःहून मागे घेतली आहे. महिला बाल कल्याण विभागाकडे योजनेसाठी अर्ज केलेल्यांपैकी राज्यातील सुमारे लाखभर अर्जाची अद्याप छाननी बाकी आहे. त्या अर्जांची आज, मंगळवारी पूर्ण करावी. त्यातून कोणते अर्ज नाकारायचे किंवा कोणते अर्ज मंजूर करायचे याचा निर्णय घेण्याचे; तसेच त्याची यादी अंतिम करण्याचेही आदेश आयुक्तांनी दिले आहेत

## बाबा मिया इनामदार नगर या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा घ्या नस्ता आम आदमी पार्टी न.प. चा करनार घेराव

शहरातील तेलगाव रोड वरती असणारे इनामदार नगर बाबा मी या कॉलनी या भागातील नागरिकांना पाठीमागील जवळपास तीन महिन्यापासून व्यवस्थित पाणीपुरवठा होत नसल्याने येथील नागरिक पाण्या वाचून दारोदार भटकंती करावी लागत आहे व येथील सामान्य नागरिक असून नगर परिषदेचे सर्व टॅक्स वेळोवेळी भरत असून या सर्वांना नळ कनेक्शन असून त्यामध्ये पाणी येत नाही नाली असून बंद पडलेल्या आहेत, रस्ते असून त्यावरती चालता येत नाही, पाणी विकत घ्यावे लागत आहे. या सर्व मूलभूत गोष्टींना कारणीभूत आपली ही नगरपरिषद आहे. आपण या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा पासून वंचित ठेवण्याचे काम केले आहे तरी आपणास विनंती करण्यात येत आहे की जर पुढील आठ दिवसांमध्ये येथील नागरिकांना पाणी लाईट नाली व रस्ते सुविधा दुरुस्त करून दिला नाही तर हे सर्व नागरिक आम आदमी पार्टीच्या माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी मार्गदर्शनात व सय्यद सादेक शहराध्यक्ष व नेतृत्वामध्ये आपल्या नगरपालिकेवरती महामोर्चा काढतील व नगरपरिषदेचा घेराव केला जाईल याची सर्वस्व जबाबदारी हे नगर प्रशासनाचे असेल असे निवेदन आज आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने देण्यात आले हे निवेदन शहर अध्यक्ष सय्यद सादेक शहराध्यक्ष रियाज पठाण ईरशद ईफरोज रफिक पठाण शकीला शेख आयेशा शेख सीमा शेख आसाम शेख इत्यादी महिलांचा मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## नवनीत काँवत यांच्या कारवाईनंतर निलंबित पोलीस कर्मचारी गायब!

बीड : नवनियुक्त पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्याची सूत्रे आपल्या हाती घेतल्यानंतर अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात धडक कारवाईला सुरुवात केली होती. या कारवाईचाच एक भाग म्हणून, काही दिवसांपूर्वी अवैध वाळू उपसा करणाऱ्यांशी साटेलोटे असल्याच्या आरोपावरून गेवराई पोलीस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. आता यातील पोलीस हवालदार अशोक हंबर्डे हे गेल्या ३ दिवसांपासून बेपत्ता असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे, गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (पी आय ) प्रवीण कुमार बांगर यांनी आपल्या बदलीसाठी नवनीत काँवत यांना अर्ज दिल्याने एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, बेपत्ता असलेले निलंबित पोलीस कर्मचारी अशोक हंबर्डे यांना एक दिवस आधीच पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी चांगल्या



कामासाठी रिवॉर्ड दिले होते. त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांचे निलंबन झाले. ज्या कारवाईसाठी हे निलंबन झाले त्यातील वस्तुस्थिती आणि पोलीस अधीक्षकांना सादर केलेला अहवाल यात तफावत असल्याचे सांगण्यात येत आहे. वाळूचे ट्रॅक्टर पकडून कारवाई न करता सोडून दिल्याचा ठपका ठेवत गेवराई पोलीस ठाण्यातील दोन पोलिसांना नवनीत काँवत यांनी निलंबित केले होते. मात्र यातील एक कर्मचारी अशोक हंबर्डे हे ३ दिवसांपासून बेपत्ता असल्याची माहिती समोर येत आहे. अशोक हंबर्डे यांचा फोनही बंद असल्याने कुटुंबीय चिंतेत आहेत. एकीकडे अवैध वाळू उपसा करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाईचा आदेश असतानाही वाळूसह गाडी ताब्यात न घेता फक्त वाहन पोलीस ठाण्यात आणून ठेवले आणि गुन्हा दाखल करण्यास देखील विलंब केल्याचा ठपका ठेवत पोलीस अधीक्षकांनी गेवराईतील दोन पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते.

# माझं राजकीय आयुष्य हे फक्त त्यांच्या हातातः धनंजय मुंडे स्पष्टच बोलले

सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी अनेक राजकीय आरोप प्रत्यारोप होत आहेत. यामुळे मराठवाड्यातील राजकारण तापलं आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईड वाल्मिक कराड असल्याचे बोललं जात आहे. वाल्मिक कराड हा मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याने त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी जोर धरु लागली आहे. त्यातच आता या प्रकरणावरुन सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडेंवर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. नॅनो युरिया, नॅनो डीएपी, बॅटरी स्पेअर, मेटाल्डे हाइड आणि कापूस गोळा करण्यासाठीच्या बॅगा यामध्ये घोटाळाच घोटाळा झाल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले. आता तरी भ्रष्टाचार समोर आला आहे. भगवानगडाने त्यांचा पाठिंबा काढून घ्यावा. मुख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा अशी मागणी त्यांनी केली, असे अंजली दमानिया म्हणाल्या. यावर आता धनंजय मुंडेंनी प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय मुंडेंनी नुकतंच पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत धनंजय मुंडेंनी संतोष देशमुख प्रकरणासह अंजली दमानियांनी केलेल्या विविध आरोपांवर स्पष्टपणे भाष्य केले. देशाच्या इतिहासात ५९ दिवस एका माणसाचं आणि एका जिल्ह्याचं, एका जातीचं, एका गावाचं मीडियाकडून ट्रायल होत आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.माझं राजकीय आयुष्य का संपवण्याचा प्रयत्न करताय?ङ्घ ङ्गजर मुख्यमंत्र्यांचे अधिकार त्यांना महीत नसेल आणि दमानियाला माहीत असेल यावर तुम्ही विश्वास ठेवाल. तुमच्या संपादकाचे अधिकार संपादकाला माहीत नाही आणि आमच्या सारख्या पुढा-्यांनी येऊन म्हणावं, तुम्ही म्हणताय संपादकाला अधिकारच नाही. हे मान्य कराल. काय चाललंय. हे गुड जर्नालिझम? माझं राजकीय आयुष्य का संपवण्याचा प्रयत्न करतायङ्घ, असा



सवाल धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला. काही तास न्यूज व्हॅल्यू ठेवली नाही माझं राजकीय आयुष्य हे जनतेच्या हातात आहे. देशाच्या इतिहासात ५९ दिवस एका माणसाचं आणि एका जिल्ह्याचं, एका जातीचं, एका गावाचं मीडियाकडून ट्रायल व्हावं. ५९ दिवसात एवढ्या मोठ्या गोष्टी देशात घडल्या. त्याची काही तास न्यूज व्हॅल्यू ठेवली नाही. पण आमचं ५९ दिवस चालतं. मला याबाबत कोण आहे, काय नाही. हे शोधाङ्घ, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

## एखाद्या प्रकरणात गोवायचं आणि बदनाम करायचं

यावेळी धनंजय मुंडे यांनी अंजली दमानिया आणि अजित पवार यांच्या भेटीवरही भाष्य केले. ङ्गज्यांच्यावर आरोप करत होत्या. त्यांच्या दारावर जावं लागतं. माझ्या लीडरवर केलेले आरोप खरे ठरले नाही. आता माझ्याच नेत्याकडे माझ्याविरोधात आरोप करावे लागतात. ठिक आहे ना. मी माझ्या पक्षाच्या डायसवर येऊन पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षासमोर सर्व सांगितलं आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना जे जे काही चाललंय ते सांगितलं आहे. एखाद्याला अशा पद्धतीने एखाद्या प्रकरणात गोवायचं आणि बदनाम करायचं. काहींना अवघड केलं असं वाटत असेल. या संवैधानिक पदावरून मोकळं पडलं तर सर्व सारखेच आहेङ्घ, असे धनंजय मुंडे म्हणाले.अंजली ताईचे सर्व मुद्दे त्या याचिकेत होतेङ्गएक महत्त्वाच्या गोष्टीची नोंद घ्या. या खरेदीबाबत अंजलीताईनी जे आरोप केले. हेच आरोप घेऊन एक व्यक्ती ठेकेदार मुंबई खंडपीठात गेला होता. हेच आरोप केले. जेव्हा सुनावणी झाली. तेव्हा कोर्टाने सांगितलं पॅरा कमी करा. ठेकेदाराला सर्व पॅरा कमी करावा लागले. अंजली ताईचे सर्व मुद्दे त्या याचिकेत होते. खंडपीठाने एक प्रकरण खंडपीठात सुरू ठेवलं. ते विथ ड्रॉ करा सांगितलं. दर तफावती बाबत त्या याचिकेत होतं. तो पॅराही कमी करायला लावला आहेङ्घ, असेही धनंजय मुंडेंनी म्हटले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com